दै. गोदातीर दि. 19/05/2024

# जिल्ह्यातील मोबाईल मिसिंगमधील १८ लाख ८५ हजार रुपयांचे ११८ अँड्रॉईड मोबाईल हस्तगत; सायबर पोलिसांची कारवाई

**नांदेड** – जिल्ह्यातील सार्वजनिक ठिकाणाहून व बाजारातून गहाळ झालेल्या मोबाईलचा शोध घेऊन ते जप्त करण्यात सायबर पोलिसांना यश आले आहे. १८ लाख ८५ हजार रुपयांचे मोबाईल हस्तगत करण्यात आले असून, कागदपत्र तपासल्यानंतर मूळ मालकांना परत देण्यात येत आहेत.

पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी सायबर पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक गंगाप्रसाद दळवी यांना आदेशीत केले होते. त्यानुसार त्यांनी सायबर पोलीस ठाण्याचे एक पथक तयार करून मिसिंग मोबाईलचा शोध घेण्याची मोहीम राबविली होती.

नांदेड जिल्ह्यातील पोलीस स्टेशनचे अंमलदार व स्थागुशाच्या पथकाने जिल्ह्यातील गहाळ झालेल्या इतर जिल्ह्यांतून व राज्याबाहेरील मोबाईलचा शोध घेवून एकूण ११८ मोबाईल किंमत १८ लाख ८५ हजार रूपयाचे मोबाईल हस्तगत केले आहेत. त्यांचे शनिवार, दि. १८ मे रोजी एकत्रितरीत्या श्रीकृष्ण कोकाटे यांच्या हस्ते ६० मोबाईलचे वाटप करण्यात आले आहे. उर्वरित हस्तगत झालेले मोबाईलचे IMEI क्रमाकाची माहिती नांदेड पोलीस दलाचे Facebook Page (Nanded Police), Twitter (Nanded Police) वर अपलोड करण्यात आली आहे. त्यापैकी नागरिकांनी आपल्या हरवलेल्या मोबाईलचा IMEI क्रमाक ओळखून सायबर पो. स्टे. नांदेड येथून मोबाईल घेवून जाण्याचे आवाहन पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी केले आहे.




सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अपर पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, डॉ. खंडेराय धरणे, पोलीस उपाधीक्षक डॉ. अश्विनी जगताप, आर्थिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक जगदिश भंडरवार, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांच्या मार्गदर्शनाखाली सायबरचे पोउपनि गंगाप्रसाद दळवी व पोलीस अंमलदार सुरेश वाघमारे, राजेन्द्र सिटीकर, दीपक ओढणे, रेशमा पठाण, विलास राठोड, दाविद पिडगे, गणेश वाघमारे, किरणकुमार वाघमारे, कृष्णा तलवारे, बालाजी सातपुते, मोहमद आसीफ, एजाजखान पठाण, काशिनाथ कारखेडे, अनिल बिरादार, दीपक शेवाळे, किशोर जैस्वाल, राजीव बोधगिरे, विलास कदम, अकबर पठाण, व्यंकटेश सांगळे, दीपक राठोड यांनी पार पाडली.